संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ९५ वा ● ● गुरुवार दि. ८ फेब्रुवारी २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# राष्ट्रवादी पक्षाचं नाव आणि चिन्ह अजित पवार गटाला

## शरद पवारांना मोठा धक्का:निवडणूक आयोगाचा निर्णय

● मुंबई
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली होती. त्यामुळे खरा पक्ष कोणता याबाबतचा निकाल निवडणूक आयोगाकडे होता. हा निकाल आता लागला असून अजित पवार गटच खरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्याचं निवडणूक आयोगाने स्पष्ट केलं आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे शरद पवार गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

जुलै महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली. तत्कालीन विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सत्ताधारी महायुतीबरोबर जात उपमुख्यमंत्री पदाचा कारभार स्वीकारला. त्यांच्याबरोबर काही आमदारही गेले. तसंच, जवळपास ७ मंत्र्यांनी त्यांच्याबरोबर मंत्रिपदाची शपथही घेतली. शिवसेनेप्रमाणे राष्ट्रवादीतही फूट पडल्याने हे प्रकरणही निवडणूक आयोगाकडे गेले. गेल्या सहा महिन्यांपासून निवडणूक आयोगाकडे राष्ट्रवादी काँग्रेस फुटीचं प्रकरण प्रलंबित होतं. गेल्या सहा महिन्यांत याप्रकरणी १० सुनावण्या निवडणूक आयोगाकडे झाल्या. या प्रत्येक सुनावणीत शरद पवार जातीने हजर होते.

अजित पवार गट आणि शरद पवार गटाकडून निवडणूक आगोयाने मागितलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली. अखेर अजित पवार गटाला राष्ट्रवादीचं पक्षचिन्ह आणि पक्षनाव देण्यात आलं आहे. त्यामुळे आगामी राज्यसभा निवडणुकीत शरद पवार गटाला पक्षचिन्ह आणि पक्षनावासाठी तीन पर्याय सुचवण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

अजित पवारांचा गट हाच खरा राष्ट्रवादी काँग्रेस असल्याचा निर्णय आज निवडणूक आयोगाने दिला आहे. आगामी राज्यसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने शरद पवार गटाला नवीन नाव आणि चिन्ह देण्यासाठी विशेष सवलत प्रदान केली आहे.शरद पवार गटाने ७ फेब्रुवारी दुपारी ३ वाजेपर्यंत तीन नावे सादर करण्यास सांगितले आहे.

निवडणूक आयोगाने अजित पवारांचा मार्ग मोकळा केल्याने आता आमदार अपात्रता निर्णय सुद्धा अजित पवारांच्याच बाजूने जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहेत. शरद पवार गटाला निवडणूक आयोगाकडून स्वतंत्र गट म्हणून मान्यता देण्यात आली आहे. निवडणूक आयोगाकडून उद्यापर्यंत (७ फेब्रुवारी) शरद पवार गटाला चिन्हाबाबत कळवण्यास सांगण्यात आलं आहे.

अजित पवार गटाचे प्रवक्ते सुनील तटकरे यांनी याबाबत प्रतिक्रिया देताना म्हटलं की, आम्ही आतिशय आनंदी आहोत. निवडणूक आयोगाने हा महत्त्वाचा निर्णय देत भारतीय लोकशाही सिध्दातांवर शिक्कामोर्तब केलं आहे. याचे अंत:करणापासून स्वागत आहे. याचा आम्हाला आनंद आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून आम्ही ठरवलेली ध्येय धोरणे ठरवून आम्ही काम करत आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून राज्यात अजित पवारांच्या नेतृत्त्वाखाली आपली भूमिका योग्य पध्दतीने बजावेल आणि राज्यातील जनतेचा फार मोठा पाठिंबा पाठबळ आम्हाला मिळेल असा विश्वास मी व्यक्त करतो असं तटकरे यांनी म्हटलं आहे.

# बनावट नोटा बाळगणाऱ्या तरुणास पाच वर्षे कारावास

● सांगली
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

बनावट नोटा बाळगल्याप्रकरणी सचिन बाबासाहेब कांबळे (वय २७, रा. रमामाता नगर, आंबेडकरनगर, रुकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) याला पाच वर्षे सश्रम कारावास व ५००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. दंड न भरल्यास आणखी १५ दिवस साधी कैद सुनावण्यात आली. सांगली येथील तदर्थ सह जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. पोतदार यांनी हा निकाल दिला.

या गुन्ह्यातील आणखी एक आरोपी अण्णा ऊर्फ समीर ऊर्फ मानसिंग यशवंत सावंत फरारी आहे. तर आरोपी मनोहरलाल गोधेजा, विनायक कुंभार, रायाप्पा गडकरी, सुहास जाधव ऊर्फ युवराज पाटील हे चौघेजण खटला चालू असताना मयत झालेले आहेत.

खटल्याची माहिती अशी : १७ सप्टेंबर २०१३ रोजी सकाळी सव्वाआठ वाजता सांगली एसटी स्थानकाच्या गेटजवळ आरोपी सचिन बाबासाहेब कांबळे ५०० रुपये मुल्याच्या बनावट नोटा खपविण्यासाठी आला होता. त्यासाठी त्याने ५०० रुपयांच्या २४ बनावट नोटा गांधीनगर (कोल्हापूर) येथील बबलू ऊर्फ हरेश यांच्याकडून आणल्या होत्या. सांगली शहरात त्या खपविण्याचा त्याचा प्रयत्न होता. याची माहिती मिळताच पोलिसांनी त्याला बनावट नोटांसह ताब्यात घेतले. शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.या गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस निरिक्षक के. जी. घाडगे यांनी केला. तपासाअंती जिल्हा न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकार पक्षातर्फे दोन साक्षीदार तपासण्यात आले. सरकारी वकिलांनी सांगितले की, हा गुन्हा समाज विरोधी असून अनेक सर्वसामान्य लोकांची फसवणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शिक्षा दिली जावी. गुन्हा शाबित झाल्याने कांबळे याला शिक्षा सुनावण्यात आली. अन्य आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली.

गुन्ह्याच्या तपासकामी कॉन्स्टेबल प्रकाश डांगे, शशिकांत कलकुटगी, सीमा धनवडे, स्वप्ना गराडे यांनी मदत केली.

# कळंब्यात फाळकुट दादाचा धिंगाणा; खाद्यपदार्थ गाडीची मोडतोड

● कोल्हापूर
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

कोल्हापूर मधील फाळकुट दादांची दहशत संपता संपत नसल्याने शहरातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. कळंबा परिसरात गुंडांकडून खाद्यपदार्थांच्या गाड्यांची तोडफोड करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडलीय.

हातात लोखंडी सळ्या आणि काट्या घेऊन तोडफोड करत दहशत माजवण्यात आली. फुकटात खायला न दिल्याने हे कृत्य केल्याचं समोर आलंय. गुंडांच्या दहशतीमुळे खाद्यपदार्थ विक्रेत्यासह स्थानिक हैराण झाले आहेत. तर पोलिसांच्या जुजबी कारवाईमुळे गावगुंडांचं धाडस वाढत चाललं आहे.

कोल्हापुरात कळंबा परिसरासह रिंग रोडवर सोमवारी मध्यरात्री गुंडांनी धिंगाणा घातला. वाहनांचीही तोडफोड केली गेली. याशिवाय तरुणांचा पाठलाग करत त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. जवळपास दोन ते तीन तास हा प्रकार सुरू होता. कळंबा परिसरात गावगुंडांची दहशत निर्माण झाल्याने नागरिकांनीही संताप व्यक्त केला आहे.

सराईत गुंडांच्या टोळीने रविवारी रात्रीसुद्धा कळबां आणि रिंग रोड परिसरात गोंधळ घातला होता. काठ्या आणि लोखंडी सळ्या घेऊन दुचाकीवरून त्यांनी रस्त्यावरील वाहनांची तोडफोड केली होती. मध्यरात्री दीड वाजता हा सगळा प्रकार रस्त्यावर सुरू होता. पोलीसांना याची माहिती मिळताच ते घटनास्थळी आले. पण तोपर्यंत तिथून सगळे गुंड गेले होते. पोलीस निघून जाताच पुन्हा गुंडांनी दहशत माजवण्यास सुरुवात केली.

# विलिंग्डनच्या प्राचार्यांना प्राध्यापकाची काठीने मारहाण

## केबिनमध्ये घुसून मारण्याचा प्रयत्न; कारची काच फोडली; जिवे मारण्याची धमकी

● सांगली
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

विश्रामबाग येथील विलिंग्डन महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हनकर यांच्या केबिनमध्ये घुसून त्यांना काठीने मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यावेळी कार्यालयातील टेबलाची काच तसेच प्राचार्य डॉ. ताम्हनकर यांच्या कारची देखील काच फोडण्यात आली. याप्रकरणी प्राचार्य डॉ. ताम्हनकर यांनी सहायक प्राध्यापक सुनील सुधाकर पाठक ( वय ४०, रा. विश्रामबाग) यांच्याविरूद्ध विश्रामबाग पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अदखलपात्र गुन्हा नोंदवला आहे.

प्रा. पाठक हे १५ वर्षापासून महाविद्यालयात कार्यरत आहेत. ते बायोमेट्रिक प्रणालीत हजेरी नोंदवत नाहीत, वरिष्ठाचा आदेश मानत नाहीत. कर्तव्यात कसूर केल्याबद्दल गतवर्षी संस्थेने त्यांना १२० दिवसासाठी निलंबित केले होते. निलंबनानंतर २३ जूनपासून ते सेवेत आहेत. त्यांची संस्थानिहाय चौकशी सुरू आहे. या कारणावरून ते प्राचार्य डॉ. ताम्हनकर यांना शिवीगाळ, दमदाटी करत होते. तसेच प्रा. पाठक यांनी त्यांच्याविरूद्ध मानसिक छळाबाबत पोलिसात तक्रारही नोंदवली होती.

दरम्यान, प्राचार्य डॉ. ताम्हनकर यांच्या कार्यालयात दि. ३० जानेवारी रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास सहकारी प्राध्यापकांची बैठक सुरू होती. तेव्हा प्रा. पाठक सायंकाळी तेथे काठी घेऊन आले. त्यांनी शिवीगाळ करत काठी उगारून प्राचार्यांकडे धाव घेतली. तेव्हा शिपाई व प्राध्यापकांनी त्यांना अडवत बाहेर नेले. तेथून पुन्हा आतमध्ये येत प्राचार्यांच्या खुर्चीला लाथ मारून टेबलावरील काच फोडली. प्राचार्य ताम्हनकर यांना जीवे मारण्याची धमकी देत ते बाहेर गेले. त्यानंतर त्यांच्या मोटार (एमएच १० सीए १६१५) वर काठीने मारण्यास सुरवात केली. सुरक्षा रक्षकांनी त्यांना अडवले. तेव्हा जवळ पडलेला दगड उचलून काचेवर मारून काच फोडल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

# एक कोटींची लाच मागितली, जीएसटी सहायक राज्यकर आयुक्तांसह टीमवर गुन्हा

● मुंबई
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

नवी मुंबईतील वाशी येथील एका व्यापाऱ्याच्या घर, कार्यालयावर थकित जीएसटीप्रकरणी छापा टाकण्यात आला होता. त्यानंतर संबंधित व्यापाऱ्याला या प्रकरणात मदत करण्यासाठी व्हॉटसअप मेसेजद्वारे एक कोटी रूपयांची लाच मागितल्याप्रकरणी जीएसटीच्या सहायक राज्यकर आयुक्तांसह त्यांच्या टीमवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबईचे सहायक पोलिस आयुक्त नितीन दळवी यांनी दिली. जीएसटी अधिकाऱ्यांसह त्याच्या संपूर्ण टीमवर लाचप्रकरणी गुन्हा दाखल झाल्याने राज्यात खळबळ उडाली आहे.

अर्जुन प्रकाश सूर्यवंशी असे गुन्हा दाखल झालेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे. जीएसटी बिल घोटाळ्यात आर्थिक तडजोड केल्याप्रकरणी सीबीआयकडून चौकशी सुरू करण्यात आल्याचे केंद्र शासनाने जाहीर केले आहे. जुलै, ऑगस्ट २०२३ मध्ये संशयित सूर्यवंशी आणि त्यांच्या टीमने वाशीतील एका व्यापाऱ्याच्या घरासह कार्यालयावर छापा टाकला होता. त्यानंतर २१ ऑगस्ट रोजी संबंधित व्यापाऱ्याकडून व्हॉटसअप मेसेजद्वारे एक कोटी रूपयांची मागणी केली होती. त्यानंतर संबंधित व्यापाऱ्याने याबाबते जीएसटीच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती.

तक्रारीनंतर विशेष राज्यकर आयुक्त तथा दक्षता अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्याबाबत मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे पत्रव्यवहार केला होता. या प्रकरणाची चौकशी केल्यानंतर सूर्यवंशी यांनी त्यांच्यासह त्यांच्या टीममधील लोकांसाठी एक कोटी रूपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे जीएसटी विभागात खळबळ उडाली आहे.

# निवडणूक आयोगाचा निर्णय म्हणजे लोकशाहीची हत्या; शरद पवार गटाची प्रतिक्रिया

● मुंबई
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

राष्ट्रवादीतील फुटीनंतर पक्षाच्या चिन्हावर शरद पवार गटासह अजित पवारांच्या नेतृत्वाखालील गटाने दावा सांगितला होता. त्यामुळे हा वाद निवडणूक आयोगाकडे गेला आणि याप्रकरणी झालेल्या सुनावणीनंतर आता आयोगाने राष्ट्रवादीचे चिन्ह आणि नाव अजित पवार गटाला देण्याचा निर्णय घेतला आहे. लोकसभा निवडणूक तोंडावर असताना राष्ट्रवादीचे नाव आणि चिन्ह अजित पवार गटाला देण्यात आल्याने हा शरद पवार गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे. यानंतर आता शरद पवार गटाकडून पहिली प्रतिक्रिया आली आहे.

राज्याचे माजी गृहमंत्री आणि शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयावर टीका केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षचिन्ह घड्याळ आणि पक्ष हे दोन्ही काढून केंद्रीय निवडणूक आयोगाने अजित पवार गटाला दिले. असाच प्रकार शिवसेनेच्या बाबतीत झाला होता. आपल्या सर्वांना कल्पना आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार यांनी स्थापन केला. इतकी वर्ष राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आहेत. मात्र, अशा पद्धतीने वरच्या दबावाखाली निवडणूक आयोगाने जो निर्णय दिला. ही एका अर्थाने लोकशाहीची हत्या आहे.सर्वोच्च न्यायालयाने चंदीगड महापौर निवडणुकीच्या बाबतीत सुनावणी घेताना म्हटले होते की, आम्ही उघड्या डोळ्यांनी लोकशाहीची हत्या होत असताना पाहू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाची ही ताजी प्रतिक्रिया असताना राष्ट्रवादी काँग्रेससोबत महाराष्ट्रात तेच घडले. हे अतिशय दुर्दैवी आहे, अशी प्रतिक्रिया अनिल देशमुख यांनी दिली.

दरम्यान, काही दिवसांत होणारी राज्यसभेची निवडणूक आणि त्यानंतर होणाऱ्या लोकसभा निवडणुकांना सामोरे जाण्यासाठी शरद पवार गटाला आता पक्षाचे नवीन नाव आणि नवीन चिन्हाचा पर्याय स्वीकारावा लागणार आहे.

# प्रशिक्षणार्थी पोलीस अंमलदार यांचा दीक्षांत संचलन सोहळा संपन्न

● तासगाव
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची - तासगांव जिल्हा सांगली येथे सत्र क्रमांक ०८ मधील ५९७ प्रशिक्षणार्थी पोलीस अंमलदार यांचा दीक्षांत संचलन सोहळा दिनांक ०६/०२ / २०२४ रोजी पोलीस प्रशिक्षण केंद्राचे कवायत मैदानावर पार पडला. दीक्षांत संचलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. सुनिल फुलारी, (भा.पो.से.) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांनी मानवंदना स्विकारली. सदरच्या दीक्षांत संचलनाचे परेड कमांडर नवप्रविष्ठ प्रशिक्षणार्थी पोलीस अंमलदार / १०, पोपट विनायक धनवे हे होते.

पोलीस प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी यांचे सत्र क्र ०८ हे ०५ जून २०२३ रोजी सुरु झाले होते. त्यामधील ५९७ प्रशिक्षणार्थी या पोलीस दलात रुजू होण्यासाठी सर्वाथाने सज्ज झाले आहेत. या सत्रामध्ये समाविष्ट असलेले ५९७ प्रशिक्षणार्थी हे लोहमार्ग, मुंबई व ठाणे शहर या घटकांमधून आले होते. या प्रशिक्षण सत्राचा कालावधी ०७ महिन्यांचा होता. सदर ०७ महिन्यांच्या कालावधीत त्यांना वेगवेगळे फौजदारी कायदे, कायदा व सुव्यवस्था, विज्ञान व तंत्रज्ञान, पोलीस प्रशासन तसेच भावनिक प्रज्ञावंत या विषयांचे सखोल ज्ञान देण्यांत आले आहे. तसेच वाहयवर्गातील शारिरीक कवायत प्रशिक्षण, परेड, पोलीस खात्यातील वेगवेगळ्या हत्यारांचे प्रशिक्षण, गोळीबार सराव, कमांडो प्रशिक्षण व योगाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमांचे वेळी मा. श्री. धीरज पाटील, प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची - तासगांव यांनी प्रशिक्षणार्थी अंमलदार यांना सेवेची शपथ दिली. तसेच पोलीस प्रशिक्षण केंद्राचे अहवाल वाचन केले.

अहवाल वाचनामध्ये मा. श्री. धीरज पाटील साहेब, प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची - तासगांव, सांगली यांनी प्रशिक्षणार्थीना परिपूर्ण पोलीस बनविण्यासाठी ई-लर्निंग, ॲम्बीस, संगणक व ट्रॉफिक मॅनेजमेंट या पूरक अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. बाहयवर्ग प्रशिक्षणामध्ये शारिरीक क्षमता विकसित होणेसाठी सर्व प्रकारची कवायत त्यासोबतच जंगल कॅम्प, नाईट फायर, योगासने, प्राणायम, कराटे इ. विषय समाविष्ट केले. त्यासोबतच नजिकच्या पोलीस स्टेशन भेटी देवून पोलीस ठाणे अंतर्गत कामकाजाचे प्रशिक्षण दिले. तसेच एक सुंदर अद्यावत व ई-ग्रंथालय व ई- बुक उपक्रम चालु करणारे महाराष्ट्रात प्रथमच पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची आहे. त्यामुळे पोलीस पाल्यांना व पोलीस अधिकारी / अंमलदार यांना स्पर्धा परिक्षाकरीता व वैयक्तीक ज्ञान वाढविणेकरीता मदत झाली आहे. इंडियन मेडीकल असोशिएशन यांच्या सहकार्याने वैद्यकीय कॅम्पचे आयोजन करण्यात आले. जिल्हा नियोजन समिती यांचेकडून ५० संगणक, २० प्रिंटर व एक कार खरेदी करण्यात आली आहे. याबद्दल मा. पालकमंत्री, सांगली व जिल्हाधिकारी, सांगली यांचेबद्दल ऋणनिर्देश व्यक्त केले.

प्रशिक्षणा दरम्यान प्राविण्य मिळविलेल्या खालील प्रशिक्षणार्थींना नावासमोर दर्शविल्याप्रमाणे बक्षिसे देवून गौरविण्यात आले.

प्रमुख पाहुणे मा.श्री.सुनिल फुलारी, (भा.पो.से.) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांनी प्रशिक्षणार्थी अंमलदार यांना मोलाचे मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये सांघीकपणे कर्तव्ये करावे. गणवेष अंगावर आली की आपण समाजाचे देणे लागतो हे लक्षात ठेवावे. पालकांना विनंती आहे की, आपल्या पाल्यांकडून इतरांकडे वाहन आहे, बंगला आहे आपल्याकडेही यावे अशी अपेक्षा ठेवू नका. प्रशिक्षणार्थीनी कोणत्याही अमिषाला बळी पडू नये. नातेवाईकांचे कारण सांगून गावाकडे बदली मागू नका. कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते, सोपविलेली कामे रोजच्या रोज पुर्ण करावे. दोषसिध्दी वाढविणेसाठी प्रयत्न करावेत. आपल्या कृतीने मानवी हक्काचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. आणि शेवटी माळरानावर अथक प्रयत्न करुन अत्यंत सुंदर असे कवायत संचलन केल्याबद्दल मा. प्राचार्य धीरज पाटील व सर्व पोलीस अधिकारी / प्रशिक्षक यांचे अभिनंदन केले.

(पान २ वर)

## सं | पा | द | की | य

# आत्मविश्वास देण्यासाठी शिक्षण आवश्यक

शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे. ते प्राशन केलेला माणूस गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहात सामिल होण्यासाठी शिक्षण हे अत्यंत महत्वाचे आहे. शिक्षणाने माणसाच्या आयुष्यात अनेक बदल होतात. फक्त नोकरी मिळवण्यासाठीच शिक्षण असते असे नाही तर व्यक्तीच्या एकूणच व्यक्तिमत्वाला आकार देण्यासाठी , जगण्याला आत्मविश्वास देण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. अल्पसंख्याक समाज तसा शिक्षणापासून दूरच होता. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावेत म्हणून महाराष्ट्र शासन विशेष प्रयत्नशील आहे. त्या प्रयत्नांचाच एक भाग म्हणजे अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी शासनाने उपलब्ध करुन दिलेली वसतीगृहांची सोय त्याबाबतष.

औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात आणि तेथून जवळच असणाऱ्या शासकीय विज्ञान संस्थेत महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थींनींसाठी तीन मजली दोन वसतीगृह उभारले आहे.त्यासाठी प्रत्येकी पाच कोटी रुपयांचा खर्च केला आहे. अल्पसंख्याक समाजातील मुलींचे शिक्षणाचे प्रमाण तसे कमीच! ते वाढीस लावण्यासाठी राहण्याची सोय चांगल्याप्रकारे व्हावी म्हणून वसतीगृहांची उपलब्धता करुन दिली आहे. महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागातर्फे सुरु करण्यात आलेल्या या वसतीगृहाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाने केले आहे. प्रत्येकी शंभर मुलींसाठी सुसज्ज असे दोन वसतीगृह बांधले आहे.

याशिवाय महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आर्थिकदृष्टया मागास मुलींसाठी दोनशे मुली राहू शकतील एवढया क्षमतेचे वसतीगृह विद्यापीठात महाराष्ट्र शासनाने उभारले आहे.

अल्पसंख्याक मुलींच्या या वसतीगृहांमध्ये एकाच छताखाली जेवण, राहणे, अभ्यासिका, वायफाय आदी सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. शिवाय अत्याधुनिक प्रकारचे पंखे, टेबल-खुर्च्या, कपाट, पिण्यासाठी शुध्दीकरण केलेले पाणी, आंघोळीसाठी सोलारचे गरम पाणी, अल्प दरात सॅनिटरी नॅपकीन्सची मशीनद्वारे सोय या गोष्टींनी ही वसतीगृहे परीपूर्ण आहेत. वसतीगृहामध्ये सुरक्षारक्षक, वॉर्डन, सफाई कर्मचारी यांच्या नेमणुका केलेल्या आहेत. वास्तव्यास असणाऱ्या मुलींच्या अडचणी तात्काळ दूर केल्या जातात.

अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थिनींसाठी वसतीगृह उभारण्यामागे या मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्यास अडचण येऊ नये हा उददेश शासनाचा होता. एरवी महानगरात किरायाने घर करुन राहायचे असेल तर भरपूर भाडे द्यावे लागते. सुरक्षेचा मोठा प्रश्न असतो. शिकत असलेल्या संस्थेजवळच किरायाने घर उपलब्ध होईल याची शाश्वती नसते. दूर अंतरावर मिळाले तर येण्याजाण्यासाठी वेगळा खर्च येतो. शिवाय जेवणाचा खर्च वेगळाच!! या अडचणी दूर व्हाव्यात यासाठीच या वसतीगृहांची सोय केली आहे.

# हिमालयाची सावली ; त्यागमूर्ती माता रमाई

आज ७ फेब्रुवारी, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची जयंती. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन

करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार , दौंड जि . पुणे ९९२२५४६२९५**

# माई सोन्याच्या बांगड्या गहाण ठेवते तेव्हा..!

**माई रमाई आंबेडकर जयंती सप्ताह**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात माता रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दुःख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दुःखाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दुःखाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दुःख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषध पाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात- रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दुःखाशय होता.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब तहानभूक विसरून पुस्तक वाचनात दंग असत. एकदा जेवणाची वेळ झाली असता रमाईंनी त्यांच्यापुढे जेवणाचे ताट ठेवले. साहेबांचे जेवण आटोपले असेल वाटून ताट उचलण्यासाठी त्या खोलीत जरा वेळानेच गेल्या, मात्र ताट तसेच उघडे. न राहून माईंनी त्यातल्या एका पुस्तकाचे पान उघडले आणि म्हणाल्या- या पुस्तकात नवऱ्याने आपल्या बायकोशी कसे वागावे, कुटुंबाशी कसे वागावे हे लिहिले असेल तेवढेच मला वाचून दाखवा. डॉ.बाबासाहेब म्हणतात- अगं वेडे, नवऱ्यानं संसार कसा करायचा, हे काही पुस्तकात लिहिलेल नसतं. विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात माता रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दुःख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दुःखाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दुःखाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दुःख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषध पाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात- रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दुःखाशय होता.

माता रमाई भीमराव आंबेडकर या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी होत. डॉ.आंबेडकर अनुयायी त्यांना आईची उपमा देत रमाई संबोधतात. माता रमाई आंबेडकर यांचा जन्म दि.७ फेब्रुवारी १८९८ रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकूजी धुत्रे- वलंगकर व आई रुक्मिणी यांच्यासह रमाई दाभोळजवळील वणदगावात नदीकाठी महारपरा वस्तीमध्ये राह त्यांना ३ बहिणी व एक भाऊ- शंकर अशी चार भावंडे होती. मोठी बहीण दापोलीत दिली होती. भिकूजी दाभोळ बंदरात माशांनी भरले टोपल्या बाजारापर्यं पोहचवत असत. त्यांना छातीचा त्रास होता. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळ्या रमाईच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर अजाण होते. काही दिवसात वडील भिकूजी यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपुरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत रहायला गेले. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडविण्यात रमाईंचा सिंहाचा वाटा आहे. रमाई म्हणजे बाबासाहेबांची सावलीच होती. त्यांनी आपले जीवन बाबासाहेबांच्या कार्याप्रती समर्पित केले नसते तर बाबासाहेबांना शून्यातून जग निर्माण करता आले नसते, हे नाकारता येत नाही. मुंबईतील भायखळा मार्केटमधील मासळी बाजार येथे बुधवार दि.४ एप्रिल १९०६ रोजी त्यांचे भीमरावांसोबत लग्न झाले.

त्यांच्या जीवनाच्या नेक हृदयदायक घटना सांगता येतील. एका प्रसंगी बाबासाहेबांच्या सत्कार समारंभात माईंना सायला लुगडे ते. तेव्हा त्यांनी बाबासाहेबांचा फेटा लुगडे म्हणून घातला. गरिबीची केवढी मोठी शोकांतिका! पण रमाईंच्या त्यागामुळे आज देशातील लाखो महिलांचे जीवनच बदलून गेले आहे. माई संसारात रमल्या, परंतु भीमराव पुस्तकांत रमले.

डॉ.बाबासाहेब व माता रमाई राजगृहात राहत असताना बाबासाहेबांना अचानक विदेशात जावे लागत होते. बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे या आपल्या मित्राकडे काही दिवसासाठी माईंना पाठविले. वराळे काका लहान मुलांचे वसतिगृह चालवित होते. त्यांच्या आवारात लहान मुले नेहमी खेळायला येत असत. दोन-चार दिवसांत माईंना त्या लहान मुलांचा लळा लागला. दोन दिवस झाले मुले आवारात दिसली नाहीत, म्हणून माईंनी काकांना विचारले. काका म्हणाले की मुले तीन दिवसांपासून उपाशी आहेत. वसतिगृहाला अन्नधान्यासाठी मिळणारे अनुदान अजून मिळालेले नाही. हे सांगताना वराळे काकाचा कंठ दाटून आला. तत्क्षणी रमाईने कपाटातील डब्यातील सोन्याच्या बांगड्या वराळे काकांना दिल्या आणि म्हणाल्या, या बांगड्या विका किंवा गहाण ठेवा, पण मुलांच्या जेवणाची त्वरित सोय करा. यावर बाबासाहेब काय म्हणतील याचा त्यांनी क्षणभरही विचार केला नाही. सोन्याच्या मूल्यापेक्षा त्यांच्या मनातील मुलांप्रती करुणा मौल्यवान ठरली. अशिक्षित असूनही बाबासाहेबांच्या कर्तृत्वाला साजेशी व स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता माईंत होती. कष्ट, त्याग, संघर्ष, मातृत्व, प्रेम हे सर्व गुण त्यांच्यात असल्यामुळे बाबासाहेबांचे त्यांच्यावर निस्सीम प्रेम होते. माईंच्या त्यागाविषयी डॉ.बाबासाहेब बहिष्कृत भारतमध्ये लिहितात- आपण परदेशी असताना रात्रंदिवस जिने प्रपंचाची काळजी वाहिली व जिला ती अजूनही करावी लागत आहे. मी स्वदेशी परत आल्यावर माझ्या विपन्नावस्थेत गवताचे भारे स्वतःच्या डोक्यावर वाहण्यातही जिने मागेपुढे पाहिले नाही, अशा अत्यंत ममताळू, सुशील व पूज्य स्त्रीच्या सहवासात दिवसाच्या चोवीस तासातून अर्धा तासही मला घालविता येत नाही. बाबासाहेबांनी व्यक्त केलेली ही खंत मन हेलावून टाकते. सन १९४०मध्ये लिहिलेला थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ बाबासाहेबांनी माईंना अर्पण केला आहे. अर्पणपत्रिकेत ते लिहितात- हृदयाचा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, चारित्र्याचे शुद्धत्व आणि याशिवाय त्याकाळी कोणी मित्र नसलेल्या दिवसात आमच्या वाट्यास आलेले दारिद्र्य आणि विवंचना मनोधैर्याने व तत्परतेने सहन करण्याची जिने तयारी दर्शविली त्या रामूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा ग्रंथ मी तिला अर्पण केला आहे.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांच्या जीवनात अत्यंत कठीण काळात रमाईने त्यांना खंबीरपणे साथ दिल्यामुळेच अस्पृश्यांचे कैवारी डॉ.बाबासाहेबांना आपल्या कोट्यवधी अस्पृश्य बांधवांचे जीवन फुलविता आले. दि.२७ मे १९३५ रोजी जगन्माता रमाईंचे मुंबई येथे दुःखद निर्वाण झाले.

!! माता रमाई जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या अपूर्व त्यागाला विनम्र अभिवादन !!

**श्री. एन. कृष्णकुमार, गडचिरोली**

# मुलगा - मुलगी भेद नको जन्माला येणाऱ्या मुलीचे स्वागत करूया ;दलित महासंघाच्या महिला सन्मान मेळाव्यात ठराव

**• भिलवडी**
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

मुलगा - मुलगी असा भेद न करता, जन्माला येणाऱ्या मुलीचे प्रत्येक कुटुंबामध्ये स्वागत केले पाहिजे असा ठराव आज दलित महासंघाच्या व बहुजन समता पार्टीने आयोजित केलेल्या महिला सन्मान मेळाव्यामध्ये करण्यात आला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी दलित महासंघाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष प्रा. पुष्पलता सकटे होत्या.

दलित महासंघ आणि बहुजन समता पार्टी आयोजित भिलवडी - माळवाडी येथे दलित महासंघाचा महिला सन्मान मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याचे उद्घाटक दलित महासंघाचे राज्य कार्याध्यक्ष मा. प्रकाश वायदंडे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून दलित महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. मच्छिंद्र सकटे म्हणाले की, आज संपूर्ण राज्यामध्ये आणि देशामध्ये स्त्रियांवर अमानुष अत्याचार होत आहेत. मुलींना पळवून नेण्याचे आणि त्यांची विक्री करण्याची रॅकेट देशभर आणि जगभर काम करत आहे. अशा परिस्थितीतही वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये मुली आपले कर्तुत्व दाखवत आहेत. परंतु, भारतामध्ये अलीकडच्या काळात रूढी, प्रथा - परंपराचे पुनर्वसन होऊ लागले असल्यामुळे महिलांच्या कडे पाहण्याचा दृष्टिकोन पुन्हा बदलू लागला आहे. संविधानाने मुलगा मुलगी समान मानले आहे, तरी देखील कुटुंबामध्ये मुलाचा जेवढा सन्मान होतो तेवढा मुलीचा होत नाही. एवढेच नाही तर, जन्माला येणाऱ्या मुलीचे जीवन गर्भातच संपविले जाते. हे सर्व थांबवले पाहिजे. त्यासाठी प्रत्येक आईने, बहिणीने आणि स्त्रीने आपल्या पोटी जन्माला येणाऱ्या मुलीचे संरक्षण केले पाहिजे असे आवाहन प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी केले.

या मेळाव्याच्या अध्यक्षपदावरून बोलताना दलित महासंघाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा प्रा. पुष्पलता सकटे म्हणाल्या की, स्त्रियांनी आपले कर्तुत्व सिद्ध केले पाहिजे. अनेक क्षेत्रांमध्ये आपला स्वाभिमान जागविला पाहिजे. आपल्यावरील अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी स्वतःच पुढे आले पाहिजे.

या मेळाव्यामध्ये दलित महासंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस उत्तम आप्पा चांदणे, दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष विकास बल्लाळ, बहुजन समता पार्टीचे जिल्हाध्यक्ष बळीराम रणदिवे, तसेच दिनकर वायदंडे सुरेश सकटे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी पत्रकार घनश्याम मोरे, पत्रकार अधिकराव लोखंडे, अनिल थोरात, दीपक कांबळे, म्हाकू मोरे, परवेज नायकवडी, ब्रह्मानंद वारे, दलित महासंघाचे पलूस तालुका अध्यक्ष नितीन मोरे उपस्थित होते.

वाळवा तालुका अध्यक्ष विजय दणाने यांनी प्रास्ताविक केले. दलित महासंघाच्या पलूस तालुका अध्यक्ष आशाताई मोरे यांनी सर्वांचे स्वागत केले तर बाळासाहेब मोरे यांनी आभार मानले.

(पान १ वरून)

# प्रशिक्षणार्थी पोलीस अंमलदार यांचा दीक्षांत संचलन सोहळा संपन्न

या कार्यक्रमांस अपर पोलीस अधीक्षक, सांगली श्रीमती रितु खोकर (भा.पो.से.), उप-विभागीय पोलीस अधिकारी, तासगांव, श्री. सचिन थोरबोले, जिल्हा परिषद सदस्य, श्री. संजय पाटील व इतर मान्यवर तसेच प्रशिक्षणार्थींचे नातेवाईक, उप-प्राचार्य, प्रशिक्षण श्री. सुजय घाटगे, सत्र समन्वयक श्री. श्रीकृष्ण हारुगडे व सर्व आंतरवर्ग अधिकारी, बाहयवर्ग अधिकारी, प्रशिक्षक, सर्व पोलीस अंमलदार व त्यांचे कुटुंबिय, मंत्रालयीन कर्मचारी, वर्ग-४ सर्व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपप्राचार्य (प्रशासन) श्री. उदय डुबल यांनी केले. कार्यक्रमाचे युटयुबवर लाईव्ह स्ट्रीमींग पोउपनि / अजित भोसले यांनी केले. तसेच संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन राखीव पोलीस निरीक्षक / राजू शिंदे यांनी केले.

# राष्ट्रीय लोकअदालत ३ मार्च रोजी

**• कोल्हापूर**
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

कोल्हापूर राष्ट्रीय लोकअदालतीचे दि ३ मार्च रोजी आयोजन केले आसून, यात सहभागी होण्याचे आवाहन विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव मा. श्री . प्रितम पाटील यांनी केले आहे . जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती .के . बी . अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील औधोगिक , सहकार , कौटुंबिक आणि कामगार न्यायालय , तसेच शाळा न्यायाधिकरण राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन केले आहे . जिल्हा व सत्र न्यायालय तसेच तालुका न्यायालय कळे खेरीवडे , मलकापूर , पन्हाळा , कागल , कुरुंदवाड , इचलकरंजी, आजरा , चंदगड , गडहिंग्लज, जयसिंगपूर, पेठवडगाव, गारगोटी , राधानगरी येथेही लोक अदालत होणार आहे .

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या उपाध्यक्ष श्रीमती जयश्रीताई मदन भाऊ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार सांगली जिल्हा काँग्रेस व काँग्रेस सेवा दलाच्या वतीने जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस सुभाष तात्या खोत यांच्या हस्ते व सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष अजित ढोले इंटक युनियनचे जिल्हाध्यक्ष सेवा दलाचे ज्येष्ठ नेते अशोकराव मालवणकर श्रीधर बारटक्के मौलाली वंटमोरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सत्कार करण्यात आला.

# विराज 'गुळपावडर उत्पादनांत नावलौकीक' मिळवेल

• विटा
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

विराज कारखान्यामध्ये तयार होणारी गुळ पावडर शंभर टक्के केमिकल फ्री आणि उत्तम प्रकारची आहे. सर्वांसाठी ती उपयुक्त आहे. त्यामुळे अलीकडच्या काळात विराज साखर कारखान्याचे नाव देशपातळीवर चमकत आहे. कारखान्याने चांगला नावलौकिक मिळविला आहे, असे प्रतिपादन माजी आमदार सदाशिवराव पाटील यांनी केले.

खानापूर तालुक्यातील आळसंद येथील विराज साखर कारखान्यातर्फे सभासदांना प्रत्येक शेअर्सला पाच किलो गुळ पावडरचे वाटप करण्यात आले. कारखान्याचे संस्थापक चेअरमन माजी आमदार सदाशिव पाटील यांच्याहस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी संचालक माजी नगराध्यक्ष वैभव पाटील, उत्तम पाटणकर, विशाल पाटील उपस्थित होते.

माजी आमदार सदाशिवराव पाटील म्हणाले, कारखान्याच्या प्रगतीमध्ये सभासदांचा सिंहाचा वाटा आहे. मागील वर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा प्रत्येक शेअर्सला पाच किलो गुळ पावडर देण्यात येत आहे. आदर्श महाविद्यालयासमोरील सदाशिवराव भाऊ पाटील तालुका खरेदी-विक्री संघ येथे सभासदांच्या सोयीसाठी गुळ पावडर उपलब्ध करण्यात आली आहे. आपल्या शेअर्स पावती, आधार कार्ड आणि पॅन कार्ड घेऊन गुळ पावडरचा लाभ घ्यावा, असे आवाहन माजी आ. पाटील यांनी केले आहे.

यावेळी गोविंद भोसले, राजेंद्र माने, अशोक मोरे, साहिल देवकर, संग्राम देशमुख, विजय कुलकर्णी, दीपक जांभळे, हैदर शिकलगार, यांच्यासह कर्मचारी, सभासद उपस्थित होते.

'आळसंद : गुळ पावडर वाटप करताना माजी आमदार सदाशिवराव पाटील, विशाल पाटील यांच्यासह मान्यवर.

# बांधकाम कामगारांची कामे तालुकास्तरावर सुविधा केंद्र स्थापन करण्याच्या खाजगीकरण धोरणा विरुद्ध मुंबई उच्च न्यायालयामध्ये केस दाखल करणार!

महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार फेडरेशनच्या वतीने सांगली निवारा भवन येथे बांधकाम कामगारांचा सहा जानेवारी रोजी भव्य मेळावा घेण्यात आला. त्यावेळेस बोलताना फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी कॉ शंकर पुजारी यांनी सांगितले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे सध्या राज्यातील बांधकाम कामगारांचे सहा लाखापेक्षा जास्त अर्ज प्रलंबित आहेत.

तारीख ४/९/२०१४ रोजी महाराष्ट्र शासनाने बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास आदेश केलेला आहे की कोणत्याही बांधकाम कामगारांचा अर्ज एका महिन्यात निकाली काढावा परंतु प्रत्यक्षात मात्र एखाद्या कामगाराचा मृत्यू जरी झाला तर त्याच्या विधवा महिलेस एकेक वर्षभर अंत्यविधीची रक्कम सुद्धा मिळत नाही.

त्यामुळे सध्या चाळीस लाख बांधकाम कामगारांनी नोंदणीसाठी राज्यात अर्ज केलेले आहेत.प्रत्यक्षात मात्र बारा लाख ८४ हजार इतकेच कामगारांची नोंदणी जिवित आहे.

अशा स्थितीमध्येच ब्रिक्स कंपनीकडून काम करणारे अनुभवी २४० कंत्राटी कामगारांना या कल्याणकारी मंडळाने कामावरून कमी केलेले आहे. त्यामुळे सर्व कामे थकित राहत आहेत. कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक करून सर्व थकीत कामे व सर्व कामकाज करण्याऐवजी तालुकास्तरावर बांधकाम कामगारांची कामे करण्यासाठी सुविधा केंद्र स्थापन करून ती खाजगी कंपन्यांना देण्यात येणार आहेत. त्यामुळे बांधकाम कामगार कोण ? हे ठरवण्याचे अधिकार खाजगी कंपनीकडे जाणार असल्यामुळे सध्या चालू असलेल्या असलेल्या गैर व्यवहारापेक्षाही जास्त गैरव्यवहार होण्याचा धोका निर्माण झालेला आहे. या धोरणाचा आम्ही निषेध करीत आहोत.

तसेच सध्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे उपकरामधून जमलेली २५ हजार कोटी रुपये रक्कम शिल्लक आहे.

त्यासाठी ३१ योजनांच्या पैकी अनावश्यक योजनांच्यावरच करोडो रुपये खर्च केले जात आहेत.

# किरकोळ कारणावरून झालं भांडण, मद्यधुंद मित्राने केला मित्राचाच घात

• नाशिक
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

कामटवाडे गावानजिक स्व. मीनाताई ठाकरे शाळेजवळ भर रस्त्यावर दोघा मित्रांमधील शु'क कारणाहून झालेल्या भांडणाचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी दुभाजकात पडलेल्या फरशीचे तुकडे डोक्यात घालून ३२ वर्षीय युवकाचा हत्या करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत आनंद इंगळे (३२, कामटवाडे) व संशयित आनंद आंबेकर (२८, कामटवाडे) हे दोघे मित्र त्रिमूर्ती चौक परिसरात एका हॉटेलमध्ये मद्यपान करीत असताना तेथेच त्यांच्यात झालेल्या शु'क कारणाच्या वादातून दोघांमध्ये बाचाबाची झाली. त्यानंतर ते दोघे कामटवाडे गाव परिसरानजिक आल्यानंतर दोघांमध्ये हाणामारी सुरु झाली. यावेळी संशयित आनंद आंबेकर याने मयत आनंद इंगळे याला जबर मारहाण करण्यास सुरुवात केली.

# लोकन्यायालय एक लोकभिमुख उपक्रम

• कोल्हापूर
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

लोकन्यायालय या लोकभिमूक उपक्रमात वैकल्पिक वाद निवारण लवाद, सलोखा / समेट , मध्यस्थ लोकअदालत हा पर्याय वेळेची पैशाची आणि श्रमाची बचत करणारा आहे . म्हणजे लोकराज्य , अशी लोकशाहीची । व्याख्या इब्राहिम लिंकन यांनी केलेली आहे. त्याचप्रमाणे लोकांसाठी आयोजित केलेला आणि लोकसहभागातून प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्याचा उपक्रम म्हणजे लोक न्यायालय / लोकअदालत

कायदा ही संकल्पना स्थिर नाही काळाप्रमाणे, परिस्थिती प्रमाणे, प्रदेशाप्रमाणे, गरजेप्रमाणे कायदा बदलत जातो . बदलत्या सामाजिक परिस्थितीनुरूप पर्यायी/ वैकल्पिक वाद निवारण केंद्र हा सामान्यांना लवकर न्याय मिळवून देणारा पर्याय ठरत आहे. वैकल्पिक अर्थात पर्यायी वाद निवारण प्रणाली ही न्यायालयातील प्रकरणांच्या सुनावणीपेक्षा वेगळी असुन , पक्ष कराला केंद्रबिंदू मानून या प्रणालीमध्ये वादाचे निराकरण केले जाते . यासाठी जिल्हा न्यायालयाच्या आवारात वैकल्पिक वाद निवारण केंद्राची सुसज्ज इमारत असुन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. श्रीमती . के .बी . अग्रवाल सो यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक लोकभिमुख उपक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाअंतर्गत वैकल्पिक वाद निवारणाव्दारे राबवले जातात .

लोकअदालत मध्ये पॅनेलचे प्रमुख म्हणून काम पाहणारे न्यायाधीश व विधिज्ञ हे उभय पक्षांमध्ये परस्पर तडजोडीचे समन्वयाने प्रकरण मिटविण्यासाठी प्रयत्नशील असतात . पंच परमेश्वर ही संकल्पना आपल्याकडे पूर्वापार प्रचलित होती . त्यानंतर गाव पंचायती अस्तित्वात आल्या या गाव पंचायतीमध्ये गावातील वाद सलोख्याने, सामंजस्याने . तडजोडीने मिटविले जात होते . त्याचेच आधुनिक रूप म्हणजे लोक न्यायालय होय विधी सेवा प्राधिकरणामार्फत लोकन्यायालयांचे आयोजन केले जाते . विधी सेवा प्राधिकरण आधिनियम१९८७ मधील तरतुदी अंतर्गत लोकन्यायालयाचे वेळोवेळी आयोजन केले जाते . साधारणता एक महिना आगोदर लोकन्यायालयाची तारीख जाहीर केली जाते. लोकन्यायालयामध्ये दिवाणी ' फौजदारी प्रकरणे तडजोड करण्यासाठी दाखल करता येतात . मोटार अपघाताविषयक प्रकरणे , भूसंपादन संदर्भातील प्रकरणे , बँका, पतसंस्था , वित्तीय संस्थाची प्रकरणे , (चेक बाउंसची ) प्रकरणे , ग्राहक तक्रार निवारण मंच , कमगार न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, सहकार न्यायालय , औधोगिक न्यायालय यांच्याकडील प्रकरणे लोकन्यायालयामध्ये ठेवता येतात . फौजदारी स्वरूपाच्या प्रकरणांमध्ये किरकोळ मारहाणीची प्रकरणे, चोरीची प्रकरणे, ज्या मालमत्तेबद्दल न्यास भंग करण्यात आला अशी प्रकरणे , फसवणुकीची प्रकरणे तसेच भारतीय दंड संहितेतील तडजोड योग्य कलमाखालील प्रकरणे हे लोकअदालतीमध्ये तडजोडीने निकाली काढली जात आहेत. संबधित न्यायालयाकडे किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे साधा अर्ज देवून प्रकरण लोकन्यायालयात ठेवण्याची विनंती करू शकतात लोकन्यायालयात प्रकरण मिटले नाही तर संबधित न्यायालयाकडे ते प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी चालू होते लोकन्यायालयामध्ये प्रकरण दाखल करून तडजोडीची शक्यता पडताळली अथवा तडजोडीसाठी प्रयत्नशील राहिले तर पक्षकारांचा फायदाच होतो यामुळे प्रकरणाचा निकाल त्वरित लागतो . न्यायालयासमोरील तपासण्या युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात परस्पर समन्वयाने प्रकरणाचा निकाल लागत असल्याने उभय पक्ष जिंकलेले आसतात .

पक्षकारांमध्ये कटुता , व्देष वाढत नाही. न्यायालयाच्या हुकु मनाम्या प्रमाणे लोकन्यायालयातील निवाड्यांची अंमलबजावणी होते. निकाली निघणाऱ्या प्रकरणामध्ये नियमानुसार न्यायालयीन शुल्क परत दिले जाते. विस्कटलेले घरटे तेव्हा आनंदाने निजले होते लोक अदालतमध्ये प्रकरण जेव्हा तडजोडीने मिटत होती. तंत्रज्ञानाच्या आकाशात गरुझेप घेत असताना आपल्या संवेदनाना सहवेदनेचे पंख ज्या दिनी लाभतील तो सुदिन हे विश्वची माझे घर असे सांगणाऱ्या संत श्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या विचारांची पताका खांदयावर घेऊन चालणारे आपण वारकरी असल्याने अशक्य हे काहीच नाही. आवश्यकता आहे ती सजग होवून आपल्या सामाजिक जाणिव आणि नेणीवा प्रगल्भ करण्याची .

**प्रितम पाटील ,सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, कोल्हापूर**

# थकबाकीमुळे वीज खंडित करण्याची मोहीम वेगात

• पुणे
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

वारंवार आवाहन करूनही वीजबिलांचा भरणा न केल्यामुळे महावितरणची आर्थिक स्थिती गंभीर होत आहे. सद्यस्थितीत पश्चिम महाराष्ट्रात घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक वर्गवारीतील १७ लाख ८५ हजार वीजग्राहकांकडे ३३२ कोटी ७९ लाख रुपयांची थकबाकी झाली आहे. त्यामुळे थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याच्या मोहिमेला वेग देण्यात आला असून ५० हजार १३६ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला.पुणे प्रादेशिक विभागामध्ये सर्वाधिक घरगुती १५ लाख ८६ हजार ग्राहकांकडे २२१ कोटी ६३ लाख रूपये तसेच वाणिज्यिक १ लाख ६५ हजार ग्राहकांकडे ६७ कोटी ४० लाख रूपये तर औद्योगिक ३३ हजार ग्राहकांकडे ४३ कोटी ७६ लाख रुपयांची थकबाकी आहे. वाढत्या थकबाकीमुळे वसूली मोहिमेला वेग देण्यात आला आहे. थकबाकीदारांचा केवळ वीजपुरवठा खंडित करणे हा महावितरणचा उद्देश नाही. परंतु वारंवार आवाहन किंवा विनंती करूनही जे थकबाकीदार थकीत वीजबिलांची रक्कम भरण्यास दाद देत नाहीत त्यांचा वीजपुरवठा खंडित करण्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे वीजग्राहकांनी चालू व थकीत बिलांचा त्वरीत भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन पुणे प्रादेशिक संचालक श्री. अंकुश नाळे यांनी केले आहे. घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांकडे मंगळवार (दि. ६) पर्यंत (कंसात ग्राहक) पुणे जिल्हा- २०९ कोटी ३६ लाख रुपये (८,५८,३१०), सातारा- २१ कोटी २१ लाख (१,९३,५६०), सोलापूर- ४६ कोटी ४१ लाख (२,५७,७९६), कोल्हापूर- ३१ कोटी ७० लाख (२,५९,१८६) आणि सांगली जिल्ह्यात २४ कोटी १० लाख रुपयांची (२,१६,०९६) थकबाकी आहे.

# सिक्स सी मुळे विद्यार्थी भविष्यवेदी घडणार : सुनील अंबी

• इस्लामपूर
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

वाळवा तालुका स्तरीय अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन व मूल्यमापन प्रशिक्षण नानासाहेब महाडिक इंजिनिअरिंग कॉलेज येथे शिक्षणविस्तार अधिकारी सुनिल अंबी स्व. नानासाहेब महाडिक कॉलेज चे प्रमुख जोशी सर यांनी भेट दिली..या प्रशिक्षणांतर्गत वाळवा तालुक्यात दुसऱ्या टप्प्यात २०० प्रशिक्षनार्थी यांनी सहभाग घेतला.या प्रशिक्षणा अंतर्गत सेल्फी विथ सक्सेस उत्तम पाटील, अर्चना कांबळे याचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते घेण्यात आला.

या प्रशिक्षणसाठी गटशिक्षणाधिकारी अजिंक्य कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणविस्तार अधिकारी अंबी साहेब, कदम मॅडम, संजय पाटील, पंचायत समितीचे विषय तज्ञ् महेश पाटील, राम यादव सर, पोखर्णीकर सर, प्रवीण पाटील यांनी नियोजन केले.या प्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी सुनील अंबी म्हणाले, विद्यार्थी आता नवीन संकल्पनेनुसार शिकण्यासाठी शिकणार यातून त्यांचा सर्वांगीण विकास होणार, सिक्स सी मुळे विद्यार्थी भविष्यवेदी होणार,बदलत्या अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन याबाबद मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षण अंतर्गत मुलांना स्वतः शिकण्यास प्रेरित करणे, शिकण्यासाठी विध्यार्थी यांना शिकण्यास आव्हान देणे,लर्निंग इंटरवेशन, जिज्ञासू वृतीचा संवाद, अध्ययन गती वाढवणे, आव्हाने स्वीकारणे, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन या विविध विषययावर मार्गदर्शन केले.

नवीन पद्धतीमध्ये शिक्षकांनी अध्यापन न करता मुलांना शिकण्यास प्रवृत्त करायचे आहे, विद्यार्थ्यांची अध्ययन गती तिप्पट करायचे आहे. या मुलांची ज्ञानाची कक्षा मोठी करायची आहे.या विषयाच्या संदर्भाने विविध कृतींचे आयोजन करण्यात आले.

सदर प्रशिक्षण तालुक्यातील शंभर टक्के शिक्षकांना देण्यात आले आहे. इयत्ता १ली ते ५ वी सर्व शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. ६ वी ते ८वी ला शिकवणाऱ्या सर्व शिक्षकांचे प्रशिक्षण दोन टप्प्यात पूर्णझाले आहे .याचे नियोजन तालुका पंचायत समिती यांनी केले. विष्णू पाटील,अमोल जाधव,रमेश पाटील, दीपक दळवी,विकास पाटील,शिवाजी साळुंखे,पल्लवी पाटील, गौरी कुलकर्णी, पल्लवी पाटील, राजवर्धन कांबळे ,सुनीता कुलकर्णी यांनी सुलभकाची भूमिका पार पाडली.


## जाहीर टेंडर नोटीस २०२३-२४

ग्रामपंचायत लेंगरेवाडी ता-आटपाडी-जि-सांगली येथील खालील कामांसाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून मोहोरबंद निविदा ब-१ व दर पत्रक मागणी करारावर मागविनेत येत आहेत.तरी खालील नमूट केलेल्या कामानुसार दर्शविलेल्या तारखेच्या कालावधीमधील निविदा मागणी अर्ज दिलेनंतर फॉर्म दिले जातील कामासमोर दर्शविलेल्या किमतीचे चलन त्यासमोर दर्शवलेल्या बॅकमध्ये भरून चलन मागणी अर्जासोबत दिल्यानंतर निविदा फॉर्म कार्यालयीन वेळेत दिले जातील. मुदतीमध्ये आलेल्या निविदेचाच फक्त विचार केला जाईल.

| अ.क्र | कामाचे नाव | लेखा शीर्षक | ज्या दर सूचीवर आधारित आहे ते वर्ष | कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | निविदा प्रकार | निविदा फार्म फी रक्कम रुपये | बयाना रक्कम रुपये १% | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख | भरलेल्या निविदा सिकृतीची तारीख व वेळ | कामाची मुदत | मक्तेदार प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे लेंगरेवाडी ता. आटपाडी येथे गावठाण परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | जनसुविधा | २०२३-२४ | ४९९९९९/- | ब -१ | २००/- | ५०००/- | ८-२-२०२४ | २०-२-२०२४ वेळ १०.०० वाजे पर्यत | ३ महिने | सुभे |

१) संपूर्ण भरलेली निविदा सांक्षाकिंत प्रतीसह दोन लिफाफा पध्दतीत सिलबंद लखोटयासह ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जमा करावे. लिफाफा क्र. १ मध्ये जि.प.प्रमाणपत्र, जी.एस.टी. प्रमाणपत्र, पॅन कार्ड व प्राप्तीकर भरणा केलेचे प्रमाणपत्र इ. सर्व कागदपत्रे असावित. २) लिफाफा क्र. २ मध्ये दरपत्रक सादर करावे. ३) प्राप्त निविदा लगतच्या मासिक मिंटीग मध्यो उघडणेत येईल. ४) उपरोक्त कामाचे बायाणा व कोऱ्या निविदा किंमत सदर निविदा स्विकारणे अगर नाकारणेचा हक्क खाली सही करणार यांनी राखून ठेवलेला आहे. कामासंबंधीची सर्व माहिती कार्यालयीन वेळेत मिळेल.

ठिकाण:- ग्रामपंचायत लेंगरेवाडी ता. आटपाडी

XXX
ग्रामसेवक ग्रामपंचायत लेंगरेवाडी
ता. आटपाडी जि. सांगली

XXX
सरपंच ग्रामपंचायत लेंगरेवाडी
ता. आटपाडी जि. सांगली

# सांगलीत ८ व ९ फेब्रुवारीला ग्रंथोत्सव

**• सांगली**
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

जिल्हा ग्रंथालय अधिकारी, सांगली कार्यालयामार्फत पद्मभूषण कै. वसंतदादा पाटील स्मारक, जुना स्टेशन चौक, सांगली येथे ग्रंथोत्सव-२०२३ चे आयोजन दि. ८ व ९ फेब्रुवारी २०२४ करण्यात आले आहे. या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन कामगार मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या हस्ते दि. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या ग्रंथोत्सवाचा जिल्ह्यातील अधिकाधिक ग्रंथप्रेमी, वाचक व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी अमित सोनवणे यांनी केले आहे.

सांगली ग्रंथोत्सव-२०२३ अंतर्गत ग्रंथदिंडी, लेखक-वाचक संवाद, परिसंवाद, कवी संमेलन, चर्चासत्र, व्याख्यान, ग्रंथ प्रदर्शन व विक्री इ. साहित्यिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. ग्रामीण व शहरी भागातील जनतेच्या वाचनसंस्कृतीमध्ये वाढ व्हावी व ग्रंथप्रेमींना एकाच ठिकाणी विविध ग्रंथ प्राप्त व्हावेत यासाठी तसेच प्रकाशक व ग्रंथविक्रेता यांना ग्रंथ विक्रीसाठी एकाच ठिकाणी आवश्यक ती सुविधा उपलब्ध व्हावी हा ग्रंथोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. ग्रंथांचा हा उत्सव सर्वांना प्रेरणादायी ठरणार आहे. या ग्रंथोत्सवामध्ये जिल्ह्यातील ३५१ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे प्रतिनिधी, सांगली शहरातील शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षक, शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, राज्यातील शासकीय मुद्रणालये, प्रकाशक व ग्रंथ विक्रेते इत्यादींचा सहभाग असणार आहे.

ग्रंथोत्सवाची सुरुवात दि. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, शिवाजी मंडई, राजवाडा चौक ते कार्यक्रम स्थळ यामार्गे आयोजित केलेल्या ग्रंथदिंडी' ने होणार आहे. त्यानंतर उद्घाटन समारंभामध्ये ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र माने हे उपस्थितांना साहित्य, ग्रंथालये आणि वाचनसंस्कृती या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. दि. ८ फेब्रुवारी रोजी दुपारी २.३० वाजता पहिल्या सत्रात आजच्या डिजीटल युगातील साहित्याची मौलिकता' या विषयावर ज्येष्ठ साहित्यिक प्रा. वैजनाथ महाजन यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद, तर दुसऱ्या सत्रात दुपारी ४ वाजता ३५० व्या शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन मूल्यांचा मागोवा' या विषयावर ज्येष्ठ व्याख्याते डॉ. सुरज चौगुले यांचे व्याख्यान आणि सायंकाळी ५.३० वाजता तिसऱ्या सत्रात प्रसिध्द कवी तथा डोंगरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष वसंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ व उदयोन्मुख कवींच्या कवितांचे' कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी दि. ९ फेब्रुवारी रोजी पहिल्या सत्रात सकाळी १० वाजता शिक्षणाधिकारी (माध्यमिक) राजेसाहेब लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालये जीवन घडवतात' या विषयावर चर्चासत्र, दुसऱ्या सत्रात दुपारी १२ वाजता जिल्ह्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांसाठी ग्रंथालय अनुदान व्यवस्थापन प्रणाली व ग्रंथालय पुरस्कार योजना या विषयासंबंधी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले असून जिल्हा ग्रंथालय अधिकारी अमित सोनवणे मार्गदर्शन करणार आहेत. तिसऱ्या सत्रात दुपारी २.३० वाजता सामान्य नागरिक आणि भारतीय संविधान या विषयावर प्रा. डॉ. विनोद पवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे.

ग्रंथोत्सवाचा समारोप दि. ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून ज्येष्ठ विचारवंत डॉ. बाबूराव गुरव हे मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर सांगली जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये सक्रिय असणाऱ्या वाचकांचा आणि निबंध व वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात येणार आहे.

या ग्रंथोत्सवांतर्गत सलग दोन दिवस शासकीय प्रकाशने, स्पर्धा परीक्षेचे ग्रंथस्टॉल आणि अन्य मान्यवर प्रकाशनांचे ग्रंथ प्रदर्शनासाठी व विक्रीकरिता उपलब्ध असणार आहेत. शासकीय प्रकाशनांची पुस्तके, दर्जेदार साहित्यिक कार्यक्रम, वाचनसंस्कृतीचा जयघोष करणारी ग्रंथदिंडी, शालेय विद्यार्थी व शिक्षक आणि जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालये यांचा सहभाग इत्यादी या ग्रंथोत्सवाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. ग्रंथ, साहित्यिक व वाचक यांच्या आनंददायी व ज्ञानवर्धक मेळाव्यात जिल्ह्यातील अधिकाधिक ग्रंथप्रेमी व वाचक व नागरिकांनी सहभागी होऊन या ग्रंथोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. सोनवणे यांनी केले आहे.

# स्वतःची क्षमता ओळखूनच क्षेत्र निवडा

**• पुणे**
**बंधुता न्यूज नेटवर्क**

पहिल्यांदा स्वतःला ओळखून मग करिअर मधील क्षेत्र निवडून त्या दिशेने जायला हवे. ज्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी केली त्यांना जीवन समजून घेता आले. प्रतिकूल परिस्थितीत आपण कसे उभे राहतो, हे स्पर्धा परीक्षांच्या तयारी करताना आपल्याला समजते. कोणत्याही क्षेत्रात काम करताना धडपड केली नाही तर यशस्वी होवू शकत नाही. भविष्याचा वेध घेणारी वृत्ती आणि विश्वास असेल तर आयुष्यात उभे राहण्याची प्रक्रिया चांगली होईल असे मत मृदा व जलसंधारण विभागाचे सचिव सुनील चव्हाण यांनी व्यक्त केले.

ग्रीन वर्ल्ड ग्रुप आणि जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे ग्रीन वर्ल्ड युथ कौन्सिल २०२४ चे आयोजन न-हे येथील जाधवर शैक्षणिक संकुलाच्या सभागृहात करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमात लेखक गौतम कोतवाल यांनी लिहीलेल्या भरारी, आयडॉल ऑफ महाराष्ट्र, आयकॉन ऑफ महाराष्ट्र, अचिव्हर्स ऑफ महाराष्ट्र या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या यशोगाथा असणाऱ्या तर माझी वसुंधरा अभियानात महाराष्ट्र शासनाने निवडलेल्या उत्कृष्ट काम केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा लेखाजोखा असणाऱ्या माझी वसुंधरा अशा पाच पुस्तकांचं करण्यात आलं.

याप्रसंगी महाराष्ट्र पेट्रो केमिकल्स कॉर्पो. ली. चे व्यवस्थापकीय संचालक भाऊसाहेब दांगडे, म्हणाले, जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर चरित्र आणि आत्मचरित्र वाचणे गरजेचे आहे. समाजातील घडलेली व्यक्तिमत्वे आपण समजून घेत त्यांच्याप्रमाणे मार्गक्रमण करण्याचा प्रयत्न करायला हवा.

# जिल्हा परिषद शाळा सिद्धार्थनगर आरळा शाळेची मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा मूल्यांकनासाठी पाहणी

**• शिराळा**
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

जिल्हा परिषद शाळा सिद्धार्थनगर आरळा शाळेस मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा मूल्यांकनासाठी कोकरुड केंद्राचे केंद्रप्रमुख आलिशा मुलाणी, उपक्रमशील शिक्षक बाजीराव पाटील,लक्ष्मण नायकवडी, राजाराम नायकवडी यांच्या टीमने भेट देऊन पाहणी केली.

यावेळी मुख्याध्यापक मोहन पवार,व अध्यक्षा नेत्रा झाडे यांनी सर्व उपक्रमाबाबत माहिती दिली.यावेळी वर्ग सजावट,शाळा सजावट, वृक्षारोपण, इमारत रंगरंगोटी, विद्यार्थी मंत्रीमंडळ, प्रधानमंत्री पोषण शक्ती योजना अंमलबजावणी,शालेय परसबाग,भाज्यांची लागवड, मेरी माटी मेरा देश उपक्रम, उपस्थिती प्रमाण शंभर टक्के,महावाचन चळवळ, विविध स्पर्धा,बचत बँक,शालेय व सहशालेय उपक्रम,स्वच्छता मॉनिटर, राष्ट्रीय एकात्मता, विविध क्रिडा स्पर्धा, विद्यार्थी व शिक्षक आरोग्य तपासणी,

**जिल्हा परिषद शाळा सिद्धार्थनगर आरळा येथे मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा मूल्यांकनासाठी शालेय परसबागेची पाहणी करताना केंद्रप्रमुख आलिशा मुलाणी, बाजीराव पाटील,लक्ष्मण नायकवडी,मोहन पवार, राजाराम नायकवडी व इतर मान्यवर**

प्रथमोपचार पेटी, विविध आजार व उपचार मार्गदर्शन,हात धुण्याचे प्रात्यक्षिक, आर्थिक व्यवहार व रोजगार मार्गदर्शन,शालेय भौतिक सुविधा उपलब्धता, शाळा व्यवस्थापन समिती प्रभावी अंमलबजावणी व कार्य, तंबाखू मुक्त शाळा,प्लास्टिक मुक्त शाळा माजी विद्यार्थी सहभागी आदी विविध उपक्रम व शाळेच्या उत्कृष्ट कार्याची पाहणी केली.सर्वच उपक्रम दर्जेदारपणे राबविल्याबद्दल अभिनंदन केले.

# ६ व्या खेलो इंडिया युथ गेम मध्ये थांग-ता मार्शल आर्ट खेळामध्ये १ सुवर्ण व १ कांस्य पदक

**• सांगली**
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

तमिळनाडू येथे झालेल्या खेलो इंडिया युथ गेम्स मध्ये थांग-ता मार्शल आर्ट या खेळ प्रकारातून महाराष्ट्रासाठी कु.आकांक्षा अनिल लवटे हिने ५२ किलो वजनी गटामध्ये सुवर्णपदक पटकावले तर जय आनंदराव फडतरे याने ५६ किलो वजनी गटात कांस्यपदक पटकावले. सहाव्या खेलो इंडिया युथ गेम्स करिता राज्यातून थांग- ता खेळामधून ४ मुली व ४ मुलांची निवड झाली होती..यामध्ये *(ऑल महाराष्ट्र थांग-ता असोसिएशन व चड्ड-तड्झच् संचलित खेलो इंडिया थांग-ता अकॅडमी सांगली चे खेळाडू) कु.आकांक्षा अनिल लवटे कु.मधुरा सुशांत घाडगे , कु .वैभव हणमंत नेरलगी, कु .आदित्य भरत शिंदे , कु.नीलम अरविंद कदम, मुंबई , कु.विद्या अनिल पाटोळे,सातारा, कु.जय आनंदराव फडतरे सातारा कु.हर्षद राजू जाधव ,सातारा सर्वांनी अत्यंत चांगली कामगिरी बजावली.

याकरिता दि २० जानेवारी ते २५ रोजी शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे क्रीडा व

युवक सेवा संचालनालय,पुणे यांच्या अंतर्गत वरील खेळाडूंचे प्रशिक्षण घेण्यात आले. खेळाडूंना ऑल महाराष्ट्र थांग-ता असोसिएशनचे सचिव महावीर धुलधर , मुख्य प्रशिक्षिका रुपाली जहागीरदार व सांगलीचे प्रशिक्षक मनोज कांडकर यांनी प्रशिक्षण दिले. तसेच सातारा चे जयवंत गोडसे सर व मुंबई चे हरिओम चौहान सर सांगली चे उदयकुमार पाटील सर यांचे ही मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष डॉ.राम लाडे यांनी मुलांना शुभेच्छा देऊन त्यांचे मनोबल वाढवले.

यावेळी संघ व्यवस्थापक नदीम शेख(उब्ज सोलापूर) यांनी खेळाडूंचे उत्कृष्ट व्यवस्थापन केले.व त्यांचे सहकार्य लाभले. थांग-ता मार्शल आर्ट या खेळासाठी खेलो इंडिया युथ गेम मध्ये ऑल महाराष्ट्र थांग ता असोसिएशनचे सचिव महावीर धुलधर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट कामगिरी बजावत खेळाडूंनी १ सुवर्ण व १ कांस्य पदक पटकावून उत्कृष्ट आशा शिष्यवृत्ती करिता पात्र ठरले..

# दर्जेदार क्रीडा सुविधांसाठी राज्य शासनातर्फे भरीव मदत

**• सांगली**
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

खेळाडूंना चांगली क्रीडांगणे, दर्जेदार प्रशिक्षक मिळण्यासाठी तालुका, जिल्हा व विभागीय क्रीडा संकुलांना भरीव मदत करीत असल्याचे प्रतिपादन उप मुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे केले. सांगली येथे न्यू उत्कर्ष क्रीडा व सांस्कृतिक मंडळ सांगली व सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कबड्डी खेळाडू यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ७१ व्या पुरूष व महिला जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धा २०२३-२४ स्पर्धेस उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार सुधीर गाडगीळ, महानगरपालिका आयुक्त सुनील पवार, उपायुक्त राहुल रोकडे व वैभव साबळे, माजी आमदार दिनकर पाटील, पद्माकर जगदाळे यांच्यासह आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वेगवेगळ्या स्पर्धेतील यशस्वी व सहभागी खेळाडुंना बक्षिसे देण्यासाठी शासनाकडून भरीव आर्थिक तरतूद करीत असल्याचे सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते क्रीडा संघटक नितीन शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मुलींच्या कबड्डी खेळातील पहिल्या तीन क्रमांकाच्या संघांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ट्रॉफी देवून सत्कार करण्यात आला.

# जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत शिराळाचे अविनाश पाटील द्वितीय

**• शिराळा**
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली जिल्हा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या अधिकारी कर्मचारी क्रीडा स्पर्धेत बुद्धिबळ या क्रीडा प्रकारात पावलेवाडी तालुका शिराळा येथील जिल्हा परिषद शाळेतील उपक्रमशील शिक्षक अविनाश पाटील यांनी दुसरा क्रमांक पटकावला. सांगली येथे ३ फेब्रुवारी व ४ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम सांगली या ठिकाणी या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धांमध्ये सर्व तालुके पंचायत समिती व जिल्हा परिषद मुख्यालय यांचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते . अविनाश पाटील यांनी अटीतटीच्या स्पर्धेमध्ये उज्वल यश संपादन केले आहे. त्यांना मुख्याध्यापिका विजया पाटील, केंद्रप्रमुख तानाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

# मध्य रेल्वेच्या ११ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार

**• पुणे**
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री राम करन यादव यांनी मध्य रेल्वेच्या ११ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार प्रदान केला आहे. ज्यामध्ये मुंबई विभागातील २, नागपूर विभागातील ३, भुसावळ विभागातील ३, सोलापूर विभागातील २ आणि पुणे विभागातील १ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दिनांक ०६.०२.२०२४ रोजी आयोजित कार्यक्रमात नोव्हेंबर-२०२३ ते जानेवारी-२०२४ या कालावधीत कर्मचाऱ्यांनी कर्तव्य बजावत असताना घेतलेल्या दक्षता, अनुचित घटना रोखण्यामध्ये आणि सुरक्षेची खात्री करण्यामध्ये दिलेल्या योगदान याबद्दल हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. या पुरस्कारामध्ये एक पदक, प्रशंसा प्रमाणपत्र, अनुकरणीय सुरक्षा कार्यासाठी प्रशस्तीपत्र आणि रु २०००/- रोख पारितोषिक आहे.

श्री पवन कुमार, तंत्रज्ञ (सी अन्ड डब्लू), मिरज, पुणे विभाग, दि. १५.१.२०२४ रोजी मिरज

यार्ड येथे मालगाडीची तपासणी करताना, ब्रेक व्हॅनच्या मध्यवर्ती पिव्होटचा वरचा भाग तुटलेला असल्याचे लक्षात आले. वॅगन तातडीने नीट नसल्याचे चिन्हांकित करण्यात आले आणि त्यामुळे त्याच्या सतर्कतेमुळे संभाव्य दुर्घटना टळली.

महाव्यवस्थापकांनी आपल्या भाषणात पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले आणि कर्तव्याप्रती सतर्कता आणि समर्पणाबद्दल त्यांचे कौतुक केले. ते म्हणाले की, अशा प्रकारच्या सतर्कतेमुळे इतरांना प्रवाशांच्या संरक्षेसाठी प्रामाणिकपणे काम करण्यास प्रवृत्त केले जाईल.

अपर महाव्यवस्थापक श्री चित्तरंजन स्वैन, प्रधान मुख्य संरक्षा अधिकारी श्री एम. एस. उप्पल, प्रधान मुख्य परिचालन व्यवस्थापक श्री एस. एस. गुप्ता, प्रधान मुख्य इंजीनियर श्री राजेश अरोरा, प्रधान मुख्य यांत्रिक इंजीनियर श्री सुनील कुमार, प्रधान मुख्य विद्युत इंजीनियर श्री एन. पी. सिंह, मुख्य प्रशासकीय अधिकारी (निर्माण) श्री मनोज अरोरा आणि मध्य रेल्वे महाव्यवस्थापक यांचे सचिव श्री पी. के. चतुर्वेदी यावेळी उपस्थित होते.

# पक्षी संवर्धन काळाची गरज : प्रा.महादेव करेनव्वर

**• जत**
**माणदेश एक्सप्रेस न्युज**

जागतिक तापमान वाढीमुळे बदलत्या नैसर्गिक चक्रामुळे जैवविविधता धोक्यात आली आहे. त्यास पक्षी देखील अपवाद नसून त्यांचे संवर्धन करणे हि काळाची गरज आहे. पक्षी जगत हे पर्यावरणाचा अविभाज्य घटक असून पक्षांना वाचवले तरच पर्यावरण व मनुष्यप्राणी जगू शकतो, असे प्रतिपादन राजे रामराव महाविद्यालय,जत मधील प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा.महादेव करेन्नवार यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालय,जत येथे फीड्स बर्ड डे या उपक्रमाचे उद्घाटन करताना बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सुरेश पाटील हे होते.

प्रा.महादेव करेन्नवार पुढे म्हणाले की, आपण प्रत्येकाने घरी असलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या किंवा डब्याचा वापर करून पक्षांसाठी अन्नपाणी पुरवून, त्यांचे संगोपन करू शकतो. पक्षी जगत हे पर्यावरणाचा अविभाज्य घटक असून पक्षांना वाचवले तरच पर्यावरण व

मनुष्यप्राणी जगू शकतो. तरी विद्यार्थ्यांनी आपल्या घरी असलेल्या, वापरात न येणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्या व डबे यांच्यापासून 'वॉटर फीडर' व 'फूड फीडर' तयार करुन झाडांच्या फांद्यांवर, घरावर लावून पक्षांना वाचवण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी शेवटी केले.

यावेळी अध्यक्षस्थानावरुन बोलताना प्राचार्य डॉ.सुरेश पाटील म्हणाले की, पशुपक्ष्यांसाठी पाणी, अन्न यासारख्या मूलभूत गरजा देखील सध्याच्या दूषित पर्यावरणामुळे तसेच वृक्षतोडीमुळे भागत नाहीत. भविष्यात वृक्षलागवड केली तरच पक्षांसाठी निवारा तसेच अन्न उपलब्ध होईल. यासाठी जतसारख्या दुष्काळी भागात जास्तीत जास्त वृक्षलागवड करून संगोपन करावे, असेही ते म्हणाले. यावेळी डॉ.राजेंद्र लवटे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक व स्वागत डॉ. मल्लाप्पा सज्जन यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.संगीता देशमुख यांनी तर आभार डॉ.शंकर सौदागर यांनी मानले.